बालविकास प्रकल्प अधिकारी, प्रभादेवी-शिवडी नागरी मुंबई
११७, बी.डी.डी. चाळ, पहिला मजला, वरळी मुंबई-१८
Email:- cdpoprabhadevi@gmail.com

जाहीरात शुध्दीपत्रक

महाराष्ट्र शासनाच्या महिला व बालविकास विभाग अंतर्गत, बाल विकास प्रकल्प अधिकारी नागरी प्रभादेवी-शिवडी, मुंबई शहर, या प्रकल्पातील ०७ अंगणवाडी मदतनीस रिक्त पदांची मानधनी तत्वावर भरती करण्यासाठी दै. नवशक्ति या वृत्तपत्रात दिनांक १८/०२/२०५ रोजी जाहीरात प्रसिध्द करण्यात आलेली होती. त्यामध्ये सदर शुध्दिपत्रकानुसार पुढील बदल करण्यात येत आहे. बृहन्मुंबई महानगरपालिका प्रभाग क्र. १८२ ऐवजी १९८, १९५ ऐवजी १९७ आणि १९६ ऐवजी १९७ असे वाचावे. तसेच प्रभाग क्र. २०२ समाविष्ट करण्यात येत आहे. प्रभाग क्र. १९३, २०१ यात कोणताही बदल झालेला नाही, उपरोक्त नागरी क्षेत्रातील अंगणवाडी मदतीनस रिक्क पदानुसार बदल करण्यात येत आहे. बृहन्मुंबई महानगरपालिका प्रभाग क्र. १९३, १९७, १९८, २०१, २०२ या नागरी क्षेत्रातील स्थानिक रहिवाशी असलेल्या, शैक्षणिक अर्हता व इतर अटीची पूर्तता करणाऱ्या फक्त महिला उमेदवारांकडून विहित नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहे. प्रकल्पाच्या नागरी क्षेत्राबाहेरील उमेदवारांच्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. तसेच अपात्र उमेदवारांचे अर्ज नाकारण्यात येतील व त्याबाबत त्यांना कोणत्याही स्वरूपात लेखी कळविण्यात येणार नाही. जाहिरात शुध्दीपत्रक प्रसिध्द झाल्यापासून १० दिवसांच्या आत अर्ज प्रत्यक्ष कार्यालयात शासकीय सुट्टी सोडून सादर करावेत. पात्रता - १) १२ वी उत्तीर्ण किंवा त्यापेक्षा अधिक, २) शैक्षणिक अर्हतेपैकी किमान एक अर्हता मराठी भाषा विषयांसह उत्तीर्ण असणे आवश्यक राहील ३) वय - १८ ते ३५ वर्ष, विधवा उमेदवार वयोमर्यादा - १८ ते ४० वर्ष, ४) लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र इत्यादी.

अर्ज मिळण्याचे व जमा करण्याचे ठिकाण
बालविकास प्रकल्प अधिकारी, नागरी प्रभादेवी-शिवडी मुंबई शहर, यांचे कार्यालय, ११७, बी.डी.डी. चाळ, पहिला मजला, वरळी, मुंबई-१८

सही/-
(प्रेमा घाटगे)
बाल विकास प्रकल्प अधिकारी,
नागरी प्रभादेवी-शिवडी
मुंबई

डीजीआयपीआर - २०२४-२५/६६९५

युनिट क्र. २५, २६ आणि २७, लक्ष्मी प्लाझा, लक्ष्मी इंडस्ट्रीअल इस्टेट, न्यु लिंक रोड, अंधेरी पश्चिम, मुंबई ४०००५३
ईमेल: mumbai_andheriwest@tmbank.in
फोन: ०२२ २६३६६२४०/२६३६६२६०
सीआयएन: एल६५११०टीएन१९२१पीएलसी००१९०८

Tamilnad Mercantile Bank Ltd — Be a step ahead in life

(नियम ८(६) ची तरतूद पहा)
स्थावर मिळकतीच्या विक्रीसाठी विक्री सूचना

सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ च्या नियम ८ (६) च्या तरतुदींसह वाचत सिक्युरिटायझेशन अँण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेटस् अँण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अंतर्गत स्थावर मिळकतींच्या विक्रीसाठी लिलाव विक्री सूचना.

सर्वसामान्य जनता आणि विशेषत: कर्जदार आणि हमीदार यांना सूचना याद्वारे देण्यात येते की, खालील वर्णिलेली स्थावर मिळकत तारण धनकोंकडे गहाण/प्रभारित आहे, जिचा अन्वयीक कब्जा तामिळनाड मर्कंटाईल बँक लिमिटेड, अंधेरी पश्चिम शाखेच्या (तारण धनको) प्राधिकृत अधिकाऱ्यांनी घेतला आहे, ती त्यानंतरचे व्याज आणि खर्चासह तामिळनाड मर्कंटाईल बँक लिमिटेड, अंधेरी पश्चिम शाखेला (तारण धनको) **२३.०२.२०२५ रोजीसची रु. २१,१३,७४२.९८ (रुपये एकवीस लाख तेरा हजार सातशे बेचाळीस आणि पैसे अठ्ठयाण्णव मात्र)** च्या वसुलीकरिता **श्री. मोहम्मद अली दवलसाहब मोमिन** यांच्या कडुन २८.०३.२०२५ रोजी ''जे आहे जेथे आहे'', ''जे आहे जसे आहे'' आणि ''जे काहि आहे तेथे आहे'' तत्त्वाने विकण्यात येणार आहे. **राखीव किंमत रु.१०,२९,०००/- आणि इसारा अनामत रक्कम रु. १,०२,९००/- राहील**

लिलावाचे ठिकाण	**तामिळनाड मर्कंटाईल बँक लि. अंधेरी पश्चिम शाखा युनिट क्र. २५, २६ आणि २७, लक्ष्मी प्लाझा, लक्ष्मी इंडस्ट्रीअल इस्टेट, न्यु लिंक रोड, अंधेरी पश्चिम, मुंबई ४०००५३. ईमेल: mumbai_andheriwest@tmbank.in फोन: ०२२ २६३६६२४०/२६३६६२६०**
लिलाव विक्रीची दिनांक आणि वेळ:	**२८.०३.२०२५ रोजीस दु.३.०० वा**

मिळकतीचे वर्णन:

श्री. मोहम्मद अली दवलसाहब मोमिन यांच्या नावे गाव बेतेगाव, तालूका आणि जिल्हा पालघर-४०१५०१ येथे स्थित असलेले आणि वसलेले गट क्र. ११५, ११६ व ११८ धारक सेक्टर IV चा पार्वती होम्स अशा ज्ञात इमारतीमधील ''टाईप सी-९'' म्हणजेच बी विंग मधील इमारत क्र. ०१ मधील ४थ्या मजल्यावर रहिवासीत नवीन फ्लॅट क्र. ४०४, मोजमापित ३८.४.९२ चौ.मीटर्स चटई क्षेत्र ४५१ चौ फु बिल्ट अप क्षेत्रवरील-समतुल्य गहाण.

सिमाबद्ध-

उत्तर: भिंत	**पूर्व: भिंत**
दक्षिण: पॅसेज	**पश्चिम: फ्लॅट क्र. ४०५**

विक्रीच्या तपशिलवार अटी आणि शर्तीसाठी कृपया सुरक्षित धनकोच्या म्हणजेच www.tmb.in वर देण्यात आलेल्या लिंकचा संदर्भ घ्या.

सही/-
प्राधिकृत अधिकारी
तामिळनाड मर्कंटाईल बँक लि.
अंधेरी पश्चिम शाखा

दिनांक : २५.०२.२०२५
ठिकाण : अंधेरी पश्चिम

जाहीर सूचना

सर्व संबंधित व्यक्ती, अधिकृत रहिवाशी, पर्यावरण विषयक मंडळे, एन.जी.ओ. आणि इतर यांना या जाहीर सूचनेद्वारे असे कळविण्यात येते कि राज्य पर्यावरण आघात मुल्यांकन प्राधिकरण महाराष्ट्र राज्य यांनी खालील वसाहत बांधकामासाठी पर्यावरण अनुमती प्रदान केली आहे. मे. कीस्काय रिअल्टर्स प्रा. लि. 702 नटराज,एम.व्ही. रोड जंक्शन, पश्चिम द्रुतगती महामार्ग,अंधेरी (पू), अंधेरी पूर्व, मुंबई उपनगर, महाराष्ट्र, 400069, वांद्रे गावातील सीटीएस क्रमांक 629 (भाग) गांधी नगर वांद्रे पूर्व, मुंबई 400051 येथे प्रस्तावित भूखंडासाठी येथे प्रस्तावित भूखंडासाठी महाराष्ट्र. E C ओळख क्रमांक - EC24C3801MH5406617N दिनांक: 03.01.2025. मंजुरी पत्राची प्रत परिवेश पोर्टलवर उपलब्ध आहे आणि ती पर्यावरण आणि वन मंत्रालयाच्या https://parivesh.nic.in/ या संकेतस्थळावरही पाहता येईल.

संचालक
मे. कीस्काय रिअल्टर्स प्रा. लि.
७०२, नटराज, एम.व्ही. रोड जंक्शन, पश्चिम द्रुतगती महामार्ग, अंधेरी (पू), अंधेरी पूर्व, मुंबईउपनगर, महाराष्ट्र, ४०० ०६९.

जाहीर सूचना

सर्व संबंधितांना कळविण्यात येते की खालीलप्रमाणे मिळकत: सर्व भाग आणि विभाग, फ्लॅट क्र. २०१, दुसरा मजला, ज्याचे रेरा चटई क्षेत्र ६१.९१ चौ. मीटर आहे, जो दुसऱ्या मजल्यावरील ''स्नेह को-ऑप. हाऊसिंग सोसायटी लिमिटेड '' या इमारतीत स्थित आहे, पंच मार्ग, वर्सोवा, अंधेरी (पश्चिम), मुंबई - ४०० ०६१ येथे असून, सदर मालमत्ता वर्सोवा गाव, अंधेरी तालुका, मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीत सी.टी.एस. क्र. ११९८ वर बांधलेली आहे. ही मालमत्ता संयुक्तरित्या (१) तारा किशनचंद रावतानी, (२) झरना आनंद रावतानी, आणि (३) भाविका गोपाल रावतानी यांच्या मालकीची आहे. या मालमत्तेवर कोणतेही वित्त किंवा गहाण कर्ज किंवा कोणत्याही प्रकारचे कर्ज नाही.

आमचे अशील, श्री. रमनाथ नवनीत प्रभू आणि सौ. अर्चना अदनानी, वरील मालमत्ता त्यांच्या मालक (१) तारा किशनचंद रावतानी, (२) झरना आनंद रावतानी, आणि (३) भाविका गोपाल रावतानी यांच्याकडून खरेदी करण्याचा मानस व्यक्त करतात.

कोणत्याही व्यक्तीस, त्यांच्या नातेवाईकांसह सदर मालमत्ता किंवा तिच्या कोणत्याही भागावर धारणाधिकार, भाडेपट्टी, परवाना, वारसा, विक्री, अदलाबदल, वाटा हक्क, गहाण, भेट, प्रभार किंवा अन्य कोणत्याही प्रकारे काही हक्क, नामाधिकार, हितसंबंध किंवा दावा असल्यास त्यांनी हा दावा खालील पत्त्यावर लेखी स्वरूपात, दाव्याचे स्वरूप स्पष्टपणे नमूद करून आणि त्यासोबत कागदपत्रीय पुरावा सादर करून, या नोटीसच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून १४ दिवसांच्या आत कळवावा. कसूर केल्यास, सदर मालमत्ता किंवा तिच्या कोणत्याही भागावर कोणताही दावा असल्यास तो त्यागलेला मानला जाईल आणि अशा कोणत्याही दाव्याचा संदर्भ न घेता व्यवहार पूर्ण केला जाईल.

सही/- आर. आर. चौधरी
(वकील, उच्च न्यायालय)
पत्ता: ०४, लक्ष्मी अपार्टमेंट रेसिडेंट्स सीएचएस लि., ठाकूर कॉम्प्लेक्स, कांदिवली (पूर्व), मुंबई - ४००१०१.
ठिकाण : मुंबई दिनांक : २६/०२/२०२५

FEDERAL BANK — YOUR PERFECT BANKING PARTNER

जाहीर सूचना
सोने लिलाव

सर्वसाधारण जनता आणि विशेषत: खाते धारकांना सूचना याद्वारे देण्यात येते की, खालील नमूद खात्यामधील तारण सोने दागिण्यांचा ई-लिलाव हा दि फेडरल बँक लि. द्वारे, **०७/०३/२०२५** रोजीस ऑनलाईन पोर्टल **https://gold.samil.in** मार्फत केला जाईल. इच्छुक खरेदीदारांनी पुढील महितीकरिता लिलाव पोर्टलवर लॉग ऑन करावे किंवा अधिक माहितीसाठी बँकेशी २८४६३०८३ वर संपर्क साधू शकतात. जर तारण दागिण्यांच्या कोणत्याही किंवा सर्व वस्तुंच्या संदर्भात वरील नमूद तारखेस कोणत्याही कारणास्तव ई-लिलाव हा पूर्ण होऊ शकला नाही, तर बँक पुढील सूचनेशिवाय पुढील कोणत्याही तारखेस वस्तूंचा खाजगी विक्री आयोजीत करेल.

शाखेचे नाव	कर्ज खाते क्रमांक
मुंबई/कांदिवली	१६२२६८००००४८४
मुंबई/कांदिवली	१६२२६८००००५७५
मुंबई/कांदिवली	१६२२६८००००६८२

सही/-
ठिकाण: मुंबई **प्राधिकृत अधिकारी**
दिनांक: २१.०२.२०२५ **द फेडरल बँक लि. करिता**

भारत सरकार
वित्त मंत्रालय, वित्तीय सेवा विभाग.
मुंबई कर्ज वसुली न्यायाधिकरण क्र. I
२रा मजला, टेलिफोन भवन, कुलाबा मार्केट, कुलाबा, मुंबई - ४००००५.

निशाणी क्र. ८
पुढील तारीख : ०७.०३.२०२५

वसुली अधिकारी यांचे समोर,
कर्ज वसुली न्यायाधिकरण, मुंबई-I.
जंगम/स्थावर मिळकतीच्या जप्तीचे वॉरंट
वसुली कार्यवाही क्र. १६० सन २०२३

इंटरनॅशनल ॲसेट रिकन्स्ट्रक्शन कंपनी प्रा. लि. आणि अन्य ...प्रमाणपत्र धारक
विरूध्द
खंडेलवाल हेरमन इलेक्ट्रॉनिक्स लि. आणि अन्य ...प्रमाणपत्र कर्जदार

ज्याअर्थी तुम्ही खंडेलवाल हेरमन इलेक्ट्रॉनिक्स लि. आणि अन्य यांनी सन्माननीय पीठासिन अधिकारी यांनी काढलेल्या वसुली प्रमाणपत्र क्र. १६० सन २०२३ च्या संदर्भातील त्यावरील व्याज आणि रु. ५१,६१,७६,१५४/- (एकावण्ण कोटी एकसष्ट लाख शहात्तर हजार एकशे चोपन्न मात्र) ची रक्कम चुकती करण्यात कसूरवार ठरले आहात.

तुम्हाला याद्वारे कोणत्याही बाबतीत खालील नमूद मिळकतीसह व्यवहार किंवा कब्जा, प्रभारासह हस्तांतर, तिसऱ्या पक्षाचा हितसंबंध निर्माण करणे, विभागणी करण्यापासून पुढील आदेशापर्यंत प्रतिबंध आणि मनाई करण्यात येत आहे आणि की सर्व व्यक्तींना असे हस्तांतर, अन्यसंक्रमण, कब्जा किंवा प्रभारान्वये कोणताही लाभ घेण्यापासून मनाई करण्यात येत आहे.

मिळकतीचे विस्तृतीकरण
(स्थावर मिळकतीचे वर्णन)
भाग-I

ए. भांडुप, मुंबई ४०००७८ येथे स्थित सर्व्हे क्र. ४८, हिस्सा क्र. १(भाग) आणि ४९ए (भाग) आणि ५०(भाग) धारक जमिनीचे सर्व ते भाग आणि विभाग. मोजमापित ११,९०७.८८ चौ. मी. किंवा तत्सम;

भाग-II

बी. मध्य प्रदेश राज्यातील इंडस्ट्रियल एरिया क्र. २, पिथमपूर, तहसिल धार, जिल्हा धार येथील प्लॉट क्र. १०१ अशा भाडेपट्टाधारक जमिनीचे सर्व ते भाग आणि विभाग. मोजमापित २५,००० चौ.मी. किंवा तत्सम आणि खालीलप्रमाणे सीमाबध्द:
उत्तरेला किंवा त्या दिशेने : ३० फूट रुंद रस्ता
दक्षिणेला किंवा त्या दिशेने : मोकळी जमीन आणि हिल स्लोप
पूर्वेला किंवा त्या दिशेने : एमपीएकेव्हीएन ची जमीन
पश्चिमेला किंवा त्या दिशेने : प्लॉट क्र. १०२

सह एकत्रित त्यावरील सर्व इमारती आणि संरचना आणि जमिनीशी जोडलेला प्लांट आणि मशिनरी किंवा जमिनीशी कायमचे जोडलेले काहीही.

२. **(जंगम मिळकतीचे वर्णन)**

महाराष्ट्र राज्यातील खंडेलवाल इस्टेट, भांडुप, मुंबई ४०००७८ आणि प्लॉट क्र. १०१, एकेव्हीएन (इंदोर) इंडस्ट्रीयल एरिया, पिथमपूर, जिल्हा धार (म.प्र.) येथे स्थित कंपनीची फॅक्टरी, परिसर आणि गोडाऊन किंवा अन्यत्र असलेल्या किंवा कंपनीचे डिस्पोझिशन किंवा आदेशासाठी कोणाही पक्षकाराने धारण केलेल्या किंवा प्रवासातील किंवा खोल समुद्रातील आणि पर्याय किंवा पर्यायाच्या मार्गाने आणि कंपनीच्या कब्जात असलेल्या किंवा ठेवलेल्या किंवा आणलेल्या सदर विद्यमान तारण सुरु असल्याच्या दरम्यान वेळोवेळी यानंतर ठेवलेल्या किंवा आता असलेल्या किंवा सुट्या आता बसवलेल्या किंवा नसलेल्या विद्यमान आणि भविष्यातील (बूक डेब्टस् वाचुन आणि वगळुन) कंपनीचा जंगम प्लांट आणि मशिनरी, मशिनरी स्पेअर्स, टुल्स आणि ॲक्सेसरीज सह कंपनीच्या संपूर्ण जंगम मिळकती.

मुंबई येथे सदर ७ फेब्रुवारी, २०२५ माझ्या हस्ते आणि न्यायाधिकरणाच्या शिक्क्याने दिले,

महेश कुमार
वसुली अधिकारी,
डीआरटी-I, मुंबई

युनिट क्र. २५, २६ आणि २७, लक्ष्मी प्लाझा, लक्ष्मी इंडस्ट्रीअल इस्टेट, न्यु लिंक रोड, अंधेरी पश्चिम, मुंबई ४०००५३
ईमेल: mumbai_andheriwest@tmbank.in
फोन: ०२२ २६३६६२४०/२६३६६२६०
सीआयएन: एल६५११०टीएन१९२१पीएलसी००१९०८

Tamilnad Mercantile Bank Ltd — Be a step ahead in life

(नियम ८(६) ची तरतूद पहा)
स्थावर मिळकतीच्या विक्रीसाठी विक्री सूचना

सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ च्या नियम ८ (६) च्या तरतुदींसह वाचत सिक्युरिटायझेशन अँण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेटस् अँण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अंतर्गत स्थावर मिळकतींच्या विक्रीसाठी लिलाव विक्री सूचना.

सर्वसामान्य जनता आणि विशेषत: कर्जदार आणि हमीदार यांना सूचना याद्वारे देण्यात येते की, खालील वर्णिलेली स्थावर मिळकत तारण धनकोंकडे गहाण/प्रभारित आहे, जिचा अन्वयीक कब्जा तामिळनाड मर्कंटाईल बँक लिमिटेड, अंधेरी पश्चिम शाखेच्या (तारण धनको) प्राधिकृत अधिकाऱ्यांनी घेतला आहे, ती त्यानंतरचे व्याज आणि खर्चासह तामिळनाड मर्कंटाईल बँक लिमिटेड, अंधेरी पश्चिम शाखेला (तारण धनको) **२२.०२.२०२५ रोजीसची रु. २६,४०,४४९.४० (रुपये सव्वीस लाख चाळीस हजार चारशे एकोणपन्नास आणि पैसे चाळीस मात्र)** च्या वसुलीकरिता **श्री. यश कमलेश धोनसा** यांच्या कडुन **२८.०३.२०२५** रोजी ''जे आहे जेथे आहे'', ''जे आहे जसे आहे'' आणि ''जे काहि आहे तेथे आहे'' तत्त्वाने विकण्यात येणार आहे. **राखीव किंमत रु.३९,००,०००/- आणि इसारा अनामत रक्कम रु. ३,९०,०००/- राहील**

लिलावाचे ठिकाण	**तामिळनाड मर्कंटाईल बँक लि. अंधेरी पश्चिम शाखा युनिट क्र. २५, २६ आणि २७, लक्ष्मी प्लाझा, लक्ष्मी इंडस्ट्रीअल इस्टेट, न्यु लिंक रोड, अंधेरी पश्चिम, मुंबई ४०००५३. ईमेल: mumbai_andheriwest@tmbank.in फोन: ०२२ २६३६६२४०/२६३६६२६०**
लिलाव विक्रीची दिनांक आणि वेळ:	**२८.०३.२०२५ रोजीस दु.३.०० वा**

मिळकतीचे वर्णन:

श्री. यश कमलेश धोनसा, यांच्या नावे गाव आगाशी रोड, विरार (पश्चिम), तालूका वसई आणि जिल्हा पालघर ४०१३०१ येथे स्थित असलेले, नवीन सर्व्हे क्र. ११५/१, ११५/४, ११५/५, ११५/६, १११ धारक, पुरापाडा, ब्लॉक क्र. १०, बालाजी कॉम्प्लेक्सच्या ''बालाजी प्लॅटीनम'' अशा ज्ञात इमारतीमधील ७व्या मजल्यावर, 'डी' विंग, (टाईप सी१), निवासी फ्लॅट क्र. ७०६, मोजमापित ७०९.५० चौ.फू. म्हणजेच ६५.९१ चौ. मीटर्स चटई क्षेत्र चे समतुल्य गहाण.

सीमाबद्ध:

उत्तर: पॅसेज	पूर्व: भिंत
दक्षिण: जीना	पश्चिम: पॅसेज

विक्रीच्या तपशिलवार अटी आणि शर्तीसाठी कृपया सुरक्षित धनकोच्या म्हणजेच www.tmb.in वर देण्यात आलेल्या लिंकचा संदर्भ घ्या.

सही/-
प्राधिकृत अधिकारी
तामिळनाड मर्कंटाईल बँक लि.
अंधेरी पश्चिम शाखा

दिनांक : २५.०२.२०२५
ठिकाण : अंधेरी पश्चिम

Reliance Industries Limited — Growth is Life

नोंदणीकृत कार्यालय: ३रा मजला, मेकर चेंबर्स ४, २२२, नरिमन पॉइंट, मुंबई - ४०० ०२१.
दूरध्वनी: ०२२-३५१५ ५०००. ई-मेल: investor.relations@ril.com
CIN: L17110MH1973PLC019786

सूचना

खाली नमूद केलेले इक्विटी शेअर सर्टिफिकेट्स जे कंपनी द्वारे दिले गेलेले आहेत, ते हरविले किंवा गहाळ झाले आहेत अस सांगितल गेल आहे. **कंपनी कायदा, २०१३ च्या कलम १२४(६) ला अनुसरून आणि सुधारित इन्व्हेस्टर एज्युकेशन आणि प्रोटेक्शन फंड अथॉरिटी (अकाऊंटिंग, ऑडिट, ट्रान्सफर आणि रिफंड) नियम, २०१६ नुसार कंपनीने नमूद केलेल्या इक्विटी शेअर सर्टिफिकेटमधील शेअर्स या आधीच इन्व्हेस्टर एज्युकेशन आणि प्रोटेक्शन फंड (आयइपीएफ) अथॉरिटीकडे आवश्यक त्या प्रक्रियांचे पालन करुन हस्तांतरित केलेले आहेत. त्यामुळे ही शेअर सर्टिफिकेट्स आपोआप रद्द झालेली आहेत आणि त्याद्वारे कोणताही व्यवहार होऊ शकत नाही.**

अनु. क्र.	फोलियो क्रमांक	नाव/संलग्न नाव	शेअर्सची संख्या	प्रमाणपत्र क्रमांक पासून - पर्यंत	विशिष्ट क्रमांक पासून - पर्यंत
१	४९५५२२६२	राजस्थान सिलेंडर्स अँण्ड कंटेनर्स लिमिटेड	४०	५६८०२९७६-९७६	१९३२१४०३९-०७८
			१०	५६८०२९७६-९७६	१२४८१०८१५५-१६४
			४०	५६८०२९७७-९७७	२०८७५७२३२-२७१
			१०	५६८०२९७७-९७७	१२५०११२५१५-५२४
			९	५६८०२९७८-९७८	७२४४०५३९-५४७
			१२	५६८०२९७८-९७८	१९३८०२९७८-९८९
			७	५६८०२९७८-९७८	२५५७५५३६६-३७२
			१	५६८०२९७८-९७८	२९२८१२६५३-६५३
			१	५६८०२९७८-९७८	३३१६२२३११-३११
			२०	५६८०२९७८-९७८	११६३९७१९४४-९६३
			५०	५६८०२९७९-९७९	११७०२९६४७८-५२७
			५०	५६८०२९८०-९८०	११७०२९६९२८-९७७
			५०	५६८०२९८१-९८१	११६७७३७५९-८०८
			११	५६८०२९८२-९८२	७२४४०५४८-५५८
			१९	५६८०२९८२-९८२	४०९३२९७६५-७८३
			२०	५६८०२९८२-९८२	११६३८४०५२४-५४३
			११	५६८०२९८३-९८३	४०९३२९७८४-७९४
			२०	५६८०२९८३-९८३	१२८८५२३००३-०२२
			१००	५६८०२९८४-९८५	१२८६७२४४८९-५८८
			१००	६२५८२३७१-३७१	२२१६८४६०३८-१३७
२	४२२५८६९५	विपुल शाह दिना शाह	८००	८६६०३२४-३३९	१२१८१४३७३-१७२
		एकुण	१३८१		

सिक्युरिटीज आणि एक्सचेंज बोर्ड ऑफ़ इंडिया (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँण्ड डिस्क्लोजर रिक्वायरमेन्टस्) रेग्युलेशन्स २०१५ च्या रेग्युलेशन ४० ला अनुसरुन, कंपनीचे इक्विटी शेअर्स भौतिक पद्धतीने हस्तांतरित करता येत नाहीत. म्हणून नागरिकांना कोणत्याही स्वरूपात या इक्विटी शेअर सर्टिफिकेट्सचा/इक्विटी शेअर्सचा व्यवहार किंवा खरेदी न करण्याबाबत सुचना देण्यात येते आहे. कोणत्याही व्यक्ती (व्यक्ती) द्वारे या इक्विटी शेअर्स/शेअर सर्टिफिकेट्स बाबतीत कोणताही दावा असला, तर त्याने असा दावा कंपनीच्या रजिस्ट्रार आणि ट्रान्सफर एजंट्स म्हणजेच: **''केफिन टेक्नॉलॉजीस लिमिटेड''**, सिलेनियम टॉवर बी, प्लॉट नं. ३१-३२, गचीबॉवली, फायनानशीयल डिस्ट्रीक्ट, नानक्रमगुडा, हैद्राबाद - ५०० ०३२ येथे ही सूचना छापून आल्यापासून **सात (७) दिवसांच्या आत** करावा. तसे केले गेले नाही तर कंपनी आयईपीएफ प्राधिकरणामार्फत या इक्विटी शेअर्सवरील कोणताही दावा, नोंदणी धारक/योग्य दावेदारांकडून कधी आणि केंव्हा ही मिळाल्यास, मान्य करेल.

रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड करिता
सही/-
सावित्री पारेख
कंपनी सेक्रेटरी आणि कंप्लायन्स ऑफिसर

स्थळ : मुंबई
दिनांक : २६ फेब्रुवारी, २०२५

www.ril.com

Estd. 1969
दि अकोला जनता कमर्शिअल को-ऑपरेटिव्ह बँक लि. अकोला
मल्टीस्टेट शेड्युल्ड बँक (R.No.MSCS/CR/83/99 Dt. 23.02.99)
मुख्य कार्यालय ''जनवैभव'', जुना कॉटन मार्केट, अकोला-४४४००१ (M.S.)

परिशिष्ट IV

ताबा सुचना
(स्थावर मालमत्ता) (रूल ८(१))

ज्या अर्थी, खालील सही करणार **दि अकोला जनता कमर्शिअल को-ऑप बँक लि., अकोला (मल्टीस्टेट शेड्युल्ड बँक)** दि सेक्युरिटायझेशन अँन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनांन्शियल ॲसेटस अँन्ड इन्फोर्समेन्ट ऑफ सेक्युरिटी इन्टरेस्ट ॲक्ट २००२ अन्वये नियुक्त केलेले अधिकृत अधिकारी आहेत आणि ज्याअर्थी, सेक्युरिटी इन्टरेस्ट (इन्फोर्समेन्ट) नियम २००२ व नियम ३ च्या कलम १३(१२) अन्वये अधिकार प्रदान केल्यावरून दि. **०३/०९/२०२२** रोजीच्या मागणी नोटीस अन्वये कर्जदार / गहाणदार / जमानतदार **(१) मे.तुलसी कन्स्ट्रक्शन्स, भागीदारी फर्म तर्फे भागीदार (i) श्री राम नरेंद्र वोरा (ii) श्री श्याम ललीत वोरा (iii) सौ. हेमाक्षी तेजस वोरा (iv) सौ. धारा प्रणव वोरा (२) श्री अश्विन प्रभुदास वोरा (३) श्री. राजेश नरेंद्र वोरा, सर्व रा. वाशी, नवी मुंबई.** यांना **रू. ५,१९,१८,२६९/- (रूपये पाच कोटी एकोणावीस लाख अठरा हजार दोनशे एकोणसत्तर फक्त)** सदरहू नोटीस मिळाल्यापासुन ६० दिवसाचे आत परतफेड करण्याबाबत मागणी नोटीस दिलेली आहे.

ज्या अर्थी, कर्जदार/गहाणदार/जमानतदार यांनी मागणी नोटीस प्रमाणे कर्जाची रक्कम वेळेच्या आत न भरल्यामुळे कर्जदार/गहाणदार/जमानतदार व इतर सर्व लोकांना या जाहिर नोटिसीद्वारे कळविण्यात येते की, खालील सही करणार अधिकृत अधिकारी यांनी सदर कायद्याच्या कलम १३(४) व नियम ८ अन्वये अधिकार प्रदान केल्यावरून खालील नमूद स्थावर मालमत्तेचा दिनांक **२१/०२/२०२५** रोजी **प्रत्यक्ष ताबा** घेतला आहे.

सबब कर्जदार/गहाणदार/जमानतदार तसेच इतर सर्व लोकांना सुचित करण्यात येते की, खालील मालमत्ते बाबत कोणताही व्यवहार करू नये. केल्यास सदरहू मालमत्तेवर **दि अकोला जनता कमर्शिअल को-ऑप बँक लि., अकोला (मल्टीस्टेट शेड्युल्ड बँक) शाखा-मुंबई (काळबादेवी), चा दिनांक ३१/०१/२०२५ पर्यंतची मुळ रक्कम रूपये ४,२५,६८,६३१/- + व्याज रूपये २६९,१८,०७५/- + पिनल चार्जेस रूपये १६,१८,५६७/- + लिगल चार्जेस रूपये १,२०,६५४/- असे एकुण घेणे रूपये ७,१२,२५,९२७/- अधिक दिनांक ०१/०२/२०२५ पासुन चे व्याज व इतर खर्च इतका बोजा राहील.**

अ.क्र	स्थावर मालमत्तेचे वर्णन
१	**मालमत्ता धारक (१) मे.तुलसी कन्स्ट्रक्शन्स, भागीदारी फर्म तर्फे भागीदार (i) श्री राम नरेंद्र वोरा (ii) श्री श्याम ललीत वोरा (iii) सौ. हेमाक्षी तेजस वोरा (iv) सौ. धारा प्रणव वोरा:-** सदरहु मालमत्ता, मौजे-पनवेल, ता.ॲन्ड रजिस्ट्रेशन सब-डिस्ट्रिक पनवेल, डिस्ट्रीक रायगड येथील असून पनवेल महानगरपालिकेच्या हद्दीतील आहे तसेच सदरहु मालमत्ता **''साई नगर''** या नावाने ओळखल्या जाणाऱ्या भागात असुन ज्याचे फिल्ड **सर्व्हे नंबर-७९७, हिस्सा नंबर १/१, एकुण क्षेत्रफळ १५३५४.०० चौ.मी. असुन यामधील ३४३०.०० चौ.मी. चा प्लॉट** यास चतुःसिमा खालील प्रमाणेः- **पुर्वेस-** सर्व्हे नंबर-४८७, **पश्चिमेस-** डी.पी.रोड, **उत्तरेस-** सर्व्हे नंबर-७९७ चा भाग व हिस्सा नंबर १/१, **दक्षिणेस -** डी.पी.रोड वर नमूद ३४३० चौ.मी. प्लॉटवर ''तुलसी सोनाटा'' या नावाने तळ मजला+९ मजली एक रहिवाशी इमारत बांधण्यात आलेली आहे ज्यात ०२ विंग्स जसे विंग-ए आणि विंग-बी चा समावेश असुन सदर बांधकामाला पनवेल महानगरपालिकेचे पत्र पीएनपी/एस.बी./२००४/२०१५ दि.३१.०३.२०१५ नुसार मंजुरात दिलेली आहे. वर नमुद रहिवासी इमारती मध्ये विंग-ए मधील फ्लॅट नं. A-406, A-501, A-604, A-703, A-704, A-902, A-903, A-904, A-905 व A-906, आणि विंग-बी मधील फ्लॅट नं. B-404, B-405, B-503, B-504, B-602, B-604, B-605, B-703, B-704 व B-903, हे सर्व फ्लॅटस बँकेत गहाण आहेत. या एकुण २० फ्लॅटस पैकी ०६ फ्लॅटसचा खालील दर्शविलेल्या प्रमाणे मा. तहसिलदार यांचे आदेशानुसार दि. २१/०२/२०२५ रोजी प्रत्यक्ष ताबा घेतला आहे. ताब्यात घेण्यात आलेल्या ०६ फ्लॅटसचे वर्णन खालील प्रमाणे. **Wing - B** Flat No. / Type / Carpet Area in Sq.mtrs / Saleable Area in Sq.mtrs. / Saleable Area in Sq.Ft. B-404 / 1BHK / 32.849 / 63.835 / 687.00 B-405 / 1BHK / 32.849 / 63.835 / 687.00 B-503 / 1BHK / 32.849 / 63.824 / 687.00 B-504 / 1BHK / 32.849 / 63.824 / 687.00 B-604 / 1BHK / 32.849 / 63.835 / 687.00 B-703 / 1BHK / 32.849 / 63.824 / 687.00 **वरील ०६ फ्लॅटसचे एकुण क्षेत्रफळ ४१२२ चौ.फुट** इतके असुन वरील वर्णनाची मालमत्तेतील अविभाजित हिस्सा, तसेच सामायीक भागातील अधिकार, साज-सामान इत्यादी.

दिनांक : २१/०२/२०२५
ठिकाण : पनवेल

अधिकृत अधिकारी,
दि अकोला जनता कमर्शिअल को-ऑप बँक लि., अकोला शाखा-मुंबई (काळबादेवी)

जाहीर सूचना

सौ. निसरीन मोईझ गांधी यांना ग्रॅण्ट रोड, वाशिंद, नेरुळ, भिवंडी, हुसेनी लकडा बाजार इत्यादी येथे स्थित विविध स्थावर मालमत्तांशी संबंधित नोव्हेंबर ०६, २०२० दिनांकित विशेष कुळमुखत्यारपत्र आणि इतर कुळमुखत्यारपत्रा द्वारे आणि अंतर्गत मी विविध अधिकार दिले होते.

सूचना याद